आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१८ जुलै २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्य सरकार नव्या पर्यटन धोरणाद्वारे १८ लाख रोजगार निर्मिती करणार
- नीट युजी २०२४ परीक्षेचा निकाल येत्या शनिवारी जाहीर करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे राष्ट्रीय चाचणी संस्थेला निर्देश
- गडचिरोली जिल्ह्यात पोलिसांबरोबरच्या चकमकीत १२ नक्षलवादी ठार झाल्यानं नक्षलवाद्यांच्या दोन दलमचा बीमोड
- पंढरपुरातून जालना इथं परतणाऱ्या भाविकांच्या जीपला जालना - राजूर मार्गावर झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू

  **आणि**

- देशातल्या शेअर बाजारात नवे उच्चांक, सेन्सेक्स ८१ हजार आणि निफ्टी २४ हजार ८०० च्या अंकांच्या वर बंद

**<><><><><>**

राज्यातल्या पर्यटनाला चालना देण्यासाठी राज्याचं पर्यटन धोरण - २०२४ तयार करण्यात आलं असून याद्वारे राज्यात अंदाजे १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आणि १८ लाख रोजगार निर्मिती करणार आहे, अशी  माहिती पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी आज दिली. दहा वर्षात पर्यटन स्थळं तसंच पायाभूत सुविधा विकसित करुन पर्यटकांचा ओघ दुप्पट करण्याचं उद्दिष्ट असल्याचं महाजन यांनी सांगितलं.

या पर्यटन धोरणानुसार, पर्यटन घटकांना भांडवली गुंतवणूकीसाठी प्रोत्साहन, सीजीएसटी कराचा परतावा, वीजदरात सवलत, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना इतर वित्तीय प्रोत्साहन, व्याज आणि अनुदान प्रोत्साहन तसंच

महिला उद्योजक, अनुसूचित जाती-जमाती, दिव्यांगांना अतिरिक्त प्रोत्साहन दिलं जाईल. ग्रामीण आणि शहरी भागात पर्यटनाद्वारे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करणे, हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. राज्यात उच्चतम दर्जाचं शाश्वत आणि जबाबदार पर्यटन विकसित करण्याच्या दृष्टीने विविध पुरस्कारही देण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. राज्यातल्या लघु, मध्यम, मेगा, अल्ट्रा मेगा प्रकल्पांना अ, ब आणि क, गटांमध्ये विभागलं असून त्यांना गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीच्या आधारे प्रोत्साहन दिलं जाणार आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करुन नवकल्पना, उत्पादकता आणि स्पर्धात्मकता वाढविण्यावर या धोरणात भर देण्यात येईल आणि राज्यातल्या एक खिडकी प्रणालीला केंद्र शासनाच्या मैत्री प्रणालीसह संलग्न केलं जाईल, अशी माहिती महाजन यांनी दिली.

**<><><><><>**

नीट युजी २०२४ परीक्षा देणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा निकाल येत्या शनिवारी दुपारी १२ वाजेपर्यंत जाहीर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय चाचणी संस्थेला दिले आहेत. नीट युजी परीक्षा घोटाळ्यासंदर्भात दाखल झालेल्या ४० याचिकांची सुनावणी सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या पीठासमोर सुरु आहे. त्यादरम्यान सर्वोच्च न्यायलयाने हे निर्देश दिले. एनटीएने शहर आणि परीक्षा केंद्राच्या तपशिलासह, परीक्षार्थींची ओळख कोणत्याही प्रकारे न दडवता आपल्या संकेतस्थळावर निकाल जाहीर करावा असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.

या परीक्षेच्या पावित्र्याशी तडजोड झाली यात शंकेला जागा नाही असा शेरा सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी दरम्यान मारला, मात्र २३ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांचं भविष्य अवलंबून असल्याने परीक्षा रद्द करणं हा अखेरचा पर्याय असेल असं स्पष्ट केलं. पुढची सुनावणी येत्या सोमवारी होणार आहे.

<><><><><>

राज्यातल्या एक हजार महाविद्यालयात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांची स्थापना करण्यात येणार आहे. या करता आतापर्यंत १९५८ महाविद्यालयांनी अर्ज केल्याची माहिती राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली. मंत्रालयात झालेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते.

आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांवर येत्या ऑगस्टपासून प्रशिक्षण कार्यक्रम सुरू होणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार कालसुसंगत तंत्रज्ञानाचे कौशल्य प्रशिक्षण महाविद्यालयीन युवक युवतींना देऊन त्यांना रोजगारासाठी सक्षम बनवण्यासाठी या केंद्रांची स्थापना होत आहे. या प्रशिक्षणासाठी १५ ते ४५ अशी वयोमर्यादा आहे. यातल्या प्रत्येक केंद्रात प्रतिवर्षी साधारण १५० तरुण-तरुणींना मोफत प्रशिक्षण देण्यात येईल, अशी माहिती लोढा यांनी यावेळी दिली.

<><><><><>

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी येत्या २० जुलैपासून पुन्हा आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे. ते आज जालना जिल्ह्यातल्या आंतरवाली इथं वार्ताहरांशी बोलत होते. येत्या ७ ऑगस्टपासून पश्चिम महाराष्ट्रातल्या जिल्ह्यांमध्ये मराठा आरक्षण जनजागृती शांतता रॅली काढण्यात येणार असून, या जनजागृती रॅलीची सुरुवात सोलापूर जिल्ह्यातून होईल. या रॅलीच्या नियोजनाबाबत पश्चिम महाराष्ट्रातल्या समन्वयकांशी आंतरवाली इथं आज चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, यापूर्वीच्या उपोषणावेळी सरकारच्या शिष्टमंडळानं दिलेलं कुठलंही आश्वासन पाळलं नाही. त्यामुळे येत्या २० जुलैपासून उपोषण करणार असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

कोल्हापूर जिल्ह्यातल्या विशाळगडावर अतिक्रमण निर्मूलन मोहिमेदरम्यान समाजकंटकांनी घातलेला हैदोस निंदनीय असून जिल्हा पोलीस प्रमुख आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हे प्रकरण घडलं. त्यामुळे जिल्हा पोलीस प्रमुखांना तात्काळ निलंबित करावं, तसंच नुकसानग्रस्तांना सरकारनं मदत करावी, अशी मागणी विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. यासंदर्भात चौकशीच्या मागणीचं पत्र सरकारला दिलं आहे, असं वडेट्टीवार यांनी सांगितलं.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात छत्तीसगडच्या सीमेलगतच्या जंगलात काल पोलिसांबरोबरच्या चकमकीत दोन दलमचा बीमोड झाल्याचं पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं. या चकमकीत १२ नक्षलवादी ठार झाले होते. त्यांच्यावर एकूण ३० लाख रुपयांचं बक्षीस होतं. या कारवाईमुळे उत्तर गडचिरोलीत सक्रिय असलेल्या 'टिपागड एलओएस' आणि 'चातगाव-कसनसूर' या नक्षल्यांच्या दोन दलमचा बीमोड झाला. या चकमकीत जखमी झालेल्या पोलिसांवर नागपूरच्या रुग्णालयात उपचार सुरु असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

पंढरपुरातून जालना इथं परतणाऱ्या भाविकांच्या जीपचा जालना - राजूर मार्गावर अपघात झाला. दुचाकीसोबत धडक बसून जीप विहिरीत पडल्यामुळं पाच

जणांचा मृत्यू झाला तर तीन जण जखमी झाले. जखमींना जालना इथं रुग्णालयात दाखल करण्यात आलं. अपघातग्रस्त जीप अद्याप विहिरीतच असून पाच भाविकांचे मृतदेह काढण्यात आले आहेत. तसंच, अद्यापही काही प्रवासी जीपमध्ये अडकल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

<><><><><>

देशातल्या शेअर बाजारात आजही तेजी दिसून आली आणि नवे विक्रम प्रस्थापित झाले. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सनं आज पहिल्यांदा ८१ हजार अंकांची पातळी ओलांडण्याचा आणि ८१ हजाराच्या वर बंद होण्याचा विक्रम नोंदवला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही पहिल्यांदाच २४ हजार ८०० च्या पलीकडे जाऊन बंद झाला. सुरुवातीची घसरण भरुन काढत दोन्ही निर्देशांकांनी दिवसअखेर तेजीकडे वाटचाल केली. दिवसअखेर सेन्सेक्स ६२७ अंकांची वाढ नोंदवून ८१ हजार ३४४ अंकांवर आणि निफ्टी १८८ अंकांची तेजी नोंदवून २४ हजार ८०१ अंकांवर बंद झाला. माहिती तंत्रज्ञान आणि वित्तीय क्षेत्रातल्या कंपन्यांनी या तेजीला हातभार लावला.

<><><><><>

वादग्रस्त आयएएस प्रशिक्षणार्थी पूजा खेडकरची आई मनोरमा खेडकर यांना न्यायालयानं तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. एका शेतकऱ्याला बंदूक रोखून धमकावल्या प्रकरणी मनोरमा खेडकर यांना रायगड जिल्ह्यात पौड इथल्या पोलिसांनी काल अटक केली होती. त्यांना आज न्यायालयात हजर करण्यात आलं.

<><><><><>

राज्याच्या विविध भागांत पावसानं जोर धरला आहे. **मुंबईत** काल रात्रीपासून मुसळधार पावसानं हजेरी लावली. शहरातले रस्ते आणि पुलांवर पाणी साचल्यामुळे

आज सकाळी अनेक ठिकाणी वाहतुक कोंडी दिसून आली, मात्र सर्व उपनगरी रेल्वे मार्गांवरची सेवा सुरळीत सुरु आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत राज्यात बहुतांश ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून, तुरळक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार स्वरूपाचा पाऊस पडेल, असा पुणे वेधशाळेच अंदाज आहे.